# शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल

## संविधान उद्देशिकेचे वाचन

## अहवाल

---

**दिनांक :-28 नोव्हेंबर 2025**

आज दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल येथे भारतीय संविधान दिनानिमित्त संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या संयोजिका मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या मा.प्राचार्या डॉ.रमा भोसले, तसेच ज्येष्ठ प्राध्यापिका मा.डॉ. बिजली दडपे , प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार, प्रा. डॉ. नीलिमा मोरे, प्रा. डॉ.उज्वला डोणे उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचा उद्देश प्रत्येक छात्राध्यापिका/छात्राध्यापक यांना संविधानाच्या उद्देशिकेचे महत्त्व समजावे, त्यातील प्रत्येक शब्दाचा अर्थ-भाव कळावा आणि संविधानाबद्दल जागरूकता निर्माण व्हावी हा होता. उद्देशिकेतील मूल्ये – न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांची जाण विद्यार्थ्यांमध्ये अधिक दृढ करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन, प्रभावी वाचन आणि विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग यामुळे संविधान दिनाचे महत्त्व अधोरेखित झाले. आणि अशा प्रकारे हा कार्यक्रम संपन्न झाला.




**संविधान दिनानिमित्त संविधान प्रस्ताविकेचे/ उद्देशिकेचे वाचन केलेले फलक लेखन**




**संविधान दिनानिमित्त उद्देशिकेचे वाचन करताना बी.एड.प्रथम व द्वितीय वर्षातील छात्राअध्यापक**




**बी. एड. प्रथम आणि द्वितीय वर्षातील छात्राअध्यापक संविधान उद्देशिकेचे वाचन करताना**




**प्रथम वर्ष बी. एड.छात्रअध्यापक विशाल फुफाणे सूत्रसंचालन व उद्देशिकेचे वाचन करताना**